# C1D/AGR101/EE/20160301

**वेळ : 3 तास** **गुण : 80**

**सूचना :**

1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
2) प्रत्येक उप-प्रश्न पाच गुणांचा आहे.
3) प्रत्येक उप-प्रश्नाचे उत्तर 75 ते 100 शब्दांत लिहा.
4) पहिल्या ओळीमध्ये प्रश्न क्रमांक आणि उप-प्रश्न लिहिल्यानंतर उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.

---

1. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) मानवी आहारात फळे व भाजीपाल्याचे महत्त्व स्पष्ट करा. 5

ब) महाराष्ट्रातील पिकांचे मुख्य हंगाम सांगून त्या हंगामात घेतल्या जाणाऱ्या पिकांची नावे लिहा. 5

क) जमिनीचे कोणतेही पाच प्रकार स्पष्ट करा. 5

ड) फळबाग लागवडीच्या पद्धती कोणत्या आणि आयत मांडणी पद्धत म्हणजे काय ते स्पष्ट करा. 5

इ) सजीव व निर्जिव कुंपणाचे महत्त्व लिहा. 5

2. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) जमिनीचे सपाटीकरण करताना कोणत्या बाबींची काळजी घ्याल. 5

ब) पीकांना हवेतून मिळणारी अन्नद्रव्ये कोणती? महापोषक (मोठ्या प्रमाणात लागणारी) अन्नद्रव्ये म्हणजे काय ते सांगून त्याची नावे लिहा. 5

क) जिवाणूखताची व्याख्या लिहून जिवाणूखतांचे प्रकार लिहा. 5

ड) प्रवाही पद्धतीने पाणी देण्यात येणाऱ्या पद्धतींची नावे सांगा तसेच आळे व बांगडी पद्धतीची माहीती द्या. 5

इ) आच्छादन म्हणजे काय? सजीव व निर्जिव आच्छादनासाठी वापरल्या जाणाऱ्या चार-चार घटकांची उदाहरणे द्या. 5

3. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) छाटणी करण्याचे उद्देश स्पष्ट करा. 5

ब) नौचींग म्हणजे काय? तसेच खाचा पाडण्याचे दोन मुख्य प्रकार कोणते आहेत? 5

क) संजीवकाचे उपयोग लिहा. 5

ड) तीन हंगामी तणे व तीन बहुवर्षायू तणांची उदाहरणे द्या. 5

इ) तणनियंत्रणाच्या मुख्य तीन पद्धतींची नावे सांगून भौतीक तणनियंत्रण पद्धतीविषयी माहीती द्या. 5

4. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) सुक्ष्म रोगजंतूचे प्रकार कोणते? मायकोप्लाझ्मा विषयी माहिती लिहा. 5

ब) रस शोषणाऱ्या किडी पिकाचे कशा प्रकारे नुकसान करतात ते स्पष्ट करा. 5

क) फळांच्या विक्रीव्यवस्थेच्या समस्येवर आपण कोणत्या सूचना सुचवाल ते स्पष्ट करा. 5

ड) बाजारपेठेला अनुसरून हॉमेटोची काढणी कोणत्या अवस्थेत कराल ते सांगा. 5

इ) फुलांची काढणी करीत असताना कोणत्या बाबींना महत्त्व द्याल ते स्पष्ट करा. 5